# प्रकरण पहिले

# प्रास्ताविक

## प्रकरण पहिले

# प्रास्ताविक


१.१ विषय प्रवेश

१.२ संशोधनाचा विषय

१.३ संशोधन विषयाचे महत्व

१.४ संशोधनाची व्याप्ती व मर्यादा

१.५ संशोधनाची उद्दिष्टे

१.६ प्रकरणांचे सुत्रिकरण

संदर्भ -

# प्रकरण पहिले

# प्रास्ताविक

## १.१ विषय प्रवेश -

शिक्षणाचे कार्य व्यक्तीचा सर्वांगीण विकास व्हावा व व्यक्ती विकासातून समाजाचा विकास व्हावा एवढया पुरतेच मर्यादित नाही. शिक्षणातून राष्ट्रीय प्रश्न सुटावेत, राष्ट्रीय गरजांची पूर्ती व्हावी असे अपेक्षिले जाते. राष्ट्रीय प्रश्नांची जाणीव व त्यासाठी करावयाच्या प्रश्नांची दिशा शिक्षणामुळे कळते. विविध राष्ट्रीय प्रश्नांचे स्वरुप आणि त्यांच्या तीव्रतेची जाणीव व्यक्तीला करुन देण्यासाठी शिक्षण हे प्रभावी साधन ठरले आहे. याचा विचार करुनच कोठारी आयोगाने (१९६४-६६)

*"भारताचे भवितव्य वर्गात घडविले जात आहे."* असे म्हटले आहे.

भारत सरकारच्या शिक्षण मंत्रालयाचे "मानवी साधन संपत्ती विकास मंत्रालय" हे नवे नामकरण १९८६ साली झाले. या नावातूनच शिक्षणाचा अर्थ स्पष्ट होतो. शिक्षणातून मानवी साधन संपत्तीचा विकास करावयाचा आहे. म्हणजे व्यक्तीचा विकास साधावयाचा आहे. "व्यक्ती विकास साधते ते शिक्षण" ही भूमिका तयार झाली. व्यक्तीच्यामध्ये शारिरीक, बौध्दिक, भावनिक, व नैतिक गुणांचे पूर्ण मानवामध्ये एकीकरण करणे हे शिक्षणाचे एक मूलग्राही व्यापक ध्येय ठरविण्यात आले. प्रा.ह.ना. जगताप यांच्या मते, "एखाद्या संघटनाच्या गरजा व व्यक्तीगत वाढ व विकासाच्या गरजा याची सांगड घालणे हे मानव संसाधन विकासाचे ध्येय असते."[१] १९८६ साली राष्ट्रीय शैक्षणिक धोरण जाहीर झाले. त्यात शिक्षणाला वर्तमानकालीन व भविष्यकालीन महत्वपूर्ण गुंतवणूक आहे, हे तत्व स्वीकारले गेले. यात पूर्व प्राथमिक शिक्षणाचे स्वरुप हे "बालसंगोपनाचे", प्राथमिक शिक्षणाच्या सार्वत्रिकीकरणासाठी अनौपचारिक कार्यक्रमांचा आधार, माध्यमिक शिक्षणात गुणवत्तेचा आग्रह, तर +२ स्तरावर व्यावसायिकरणाचा कार्यक्रम हे उद्देश ठेवण्यात आले व त्यानुसार शिक्षणाची अंमलबजावणी चालू झाली.

व्यक्ती व समाज या दोघांच्याही दृष्टीने शिक्षण ही अत्यंत महत्वाची प्रक्रिया असते. शिक्षणाच्या प्रक्रियेत अनेकांचा समावेश असतो. सर्वात सामंजस्य राखण्यासाठी जी यंत्रणा उभी केली जाते ती म्हणजे शैक्षणिक प्रशासन होय.

आजची जीवघेणी स्पर्धा, लोकसंख्येचा विस्फोट, ज्ञान-विज्ञान क्षेत्रात होणारे प्रचंड बदल, झपाटयाने वाढत जाणारे औद्योगिकरण व एकविसाव्या शतकातील आव्हाने इत्यादींचा विचार करता, समाज जीवनाच्या कोणत्याही क्षेत्रात यशस्वी होण्याची त्रिसूत्री म्हणजे - प्रशासन, व्यवस्थापन आणि संघटन होय. शिक्षणातील सामर्थ्य ओळखून भारतीय शिक्षण तज्ञांनी बदलत्या सामाजिक जीवनानुसार शिक्षणाला अनुकुल अशा वातावरणात वाढ करण्यासाठी शैक्षणिक प्रशासनाचा नव्याने विचार सुरु केला. प्रा.ग.वि. अकोलकर व प्रा.ना.वि. पाटणकर यांच्या मते, "आखलेल्या योजनांची कार्यवाही व नियमांची अंमलबजावणी म्हणजे प्रशासन होय"[२]. शालेय प्रशासनातील कामे परस्परपुरक व परस्परावलंबी असतात तेथे संयोजनाची गरज अधिक असते. संयोजन याचा अर्थ सर्वानी मिळून सहकार्याने करावयाची योजनेची कार्यवाही असा करता येईल.

कर्मचारी वर्गाची मांडणी, व्यक्तींची नेमणूक जनतेचे सहकार्य मिळविणे, लोकांना माहिती देणे, लोकांवर चांगले संस्कार करणे, तांत्रिक आर्थिक उपलब्ध आकडेवारी या विषयी माहिती संकलीत करण्यासाठी निरनिराळया स्तरांवर लोकांचा जास्तीत जास्त सहयोग साधणे. अशा पायांवर, नियोजन करण्याची सुयोग्य संघटनात्मक पध्दती अवलंबिणे इत्यादी गोष्टींचा शैक्षणिक प्रशासनात अंतर्भाव होतो. कामाचा दर्जा उंचावून, वेळ, श्रम व पैसा यांचा अपव्यय टाळून योग्य त्या प्रकारे विनियोग करण्यात शालेय प्रशासनाची महत्वाची भूमिका असते.

शैक्षणिक प्रशासनात विद्यार्थी हा केंद्रबिंदू मानून विद्यार्थी हिताच्या दृष्टीने आवश्यक असणा-या सर्व घटक, उपघटकांचा अंतर्भाव होतो. त्यात प्रामुख्याने विद्यार्थी, शालेय वातावरण, शिक्षक-विद्यार्थी संबंध, शाळा-समाज आंतरक्रिया शाळा-शासन आंतरक्रिया अशा विविध बाजू येतात. प्रशासनाचा शब्दशः अर्थ कारभाराची व्यवस्था पाहणे, व्यवहार चालविणे असा होतो. श्री. फॅयोल यांच्या मते "प्रशासन म्हणजे नियोजन करणे, संघटीत करणे, समादेश देणे, समन्वय करणे, नियंत्रण ठेवणे होय."[३] प्रा.श्री. दा. ताम्हणकर शैक्षणिक प्रशासनाविषयी पुढीलप्रमाणे प्रतिपादन करतात. "सामाजिक आणि राजकीय गरजा आणि आकांक्षा यावर आधारीत समाज आणि शासन यांनी मान्य केलेले हेतू सुकर रितीने साध्य करण्याकरता, उपलब्ध योग्य साधनसामग्री आणि मनुष्यबळ यांचा जास्तीत जास्त आणि परिणामकारक उपयोग होईल अशा अध्ययन आणि अध्यापन विषयक अनुरुप कार्यक्रमाव्दारा मानवी गुणांचा विकास प्रभावितपणे प्रवर्तित करण्याची प्रक्रीया म्हणजे शैक्षणिक प्रशासन होय"[४].

शैक्षणिक प्रशासन हा शिक्षणाच्या विकासाचा एक अंगभूत भाग आहे. तो एक सामाजिक उपक्रम आहे. त्यात शैक्षणिक बाबींचे नियोजन, प्रशासनाच्या निरनिराळया घटकातील संबंध आणि सहकार, प्रशासनाचे विकेंद्रीकरण, वित्तव्यवस्था, प्रशासक, शिक्षक व कर्मचारी वर्गाचे प्रशिक्षण महत्वाच्या साहित्याची तरतूद, परिणामाचे मूल्यमापन, समाज व संस्था यातील संबंध, शैक्षणिक नियोजनाला द्यावयाची प्रसिध्दी, संस्था आणि समाजातील निरनिराळया घटकांना प्रेरणा देणे, उत्तेजित करणे, कार्यप्रवृत्त करणे आणि भविष्यकालाच्या स्वरुपाविषयीचा अंदाज बांधून तत्संबंधी मार्गदर्शन करणे इत्यादी बाबींचा समावेश प्रशासनात होतो. शैक्षणिक प्रशासनात व्यक्तीमत्वाची घडण आणि विकास हे प्रमुख उद्दिष्ट असते. व्यक्तीच्या अंतःप्रवृत्तीच्या विकासास प्राधान्य असते. प्रयोगशीलतेवर विश्वास असतो. शैक्षणिक प्रशासनाचे यश गणिती सिध्दांतावर फारसे अवलंबून नसते तर ते व्यक्तिविकासावर अवलंबून असते. राष्ट्रीय उद्दिष्टे प्रत्यक्षात आणण्याचे साधन म्हणजे शिक्षण होय. मनुष्यबळाचा वापर करताना मनुष्यातील उपक्रमशीलता आणि सर्जनशीलता यांना जास्तीत जास्त वाव दिला पाहिजे. आपल्या देशाच्या एकूण लोकसंख्येपैकी फक्त ५२.११ टक्के लोक साक्षर आहेत. आपल्या महाराष्ट्रात स्त्रियांच्या साक्षरतेचे प्रमाण खूपच कमी आहे. आणि ही बाब विकास प्रक्रियेच्या दृष्टीकोनातून फारच चिंतनिय आहे.

संशोधक हे सोलापूर जिल्हयातील माढा तालुकयातील कुर्डुवाडी गावामध्ये कुर्डुवाडी नगरपालिकेने चालविलेल्या महात्मा ज्योतिबा फुले विज्ञान व कला उच्च माध्यमिक प्रशालेमध्ये जून १९८२ पासून सहशिक्षक म्हणून काम करीत आहेत. ही उच्च माध्यमिक प्रशाला नगरपालिकेने चालविलेल्या भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर माध्यमिक प्रशालेशी संलग्न आहे. त्याचप्रमाणे नगरपालिकेकडे गावातील प्राथमिक शिक्षणाची जबाबदारी सुध्दा आहे. संशोधक हे माढा तालुक्यातील प्राथमिक, माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षकांसाठी असलेल्या उदबोधन वर्ग चर्चासत्रे, कार्यशाळा, सेवांतर्गत प्रशिक्षण आदी उपक्रमांत तज्ञ मार्गदर्शक म्हणून नेहमीच सहभागी होत असतात. या विविध उपक्रमाव्दारे संशोधकाची विविध स्तरावर अध्यापन करणा-या

शिक्षकांशी वैचारिक आंतरक्रिया होऊ शकली. त्यातील चर्चेतूनच प्राथमिक शिक्षण हा पायाभूत स्तर आहे. परंतु विविध गोष्टींचा अभाव व त्रुटीमूळे प्राथमिक शिक्षणाची हेळसांड व परवड होत आहे अशी कारणमीमांसा झाली. खरे पाहिले तर प्रा. लीला पाटील व प्रा. विश्वंभर कुलकर्णी यांनी म्हटल्या प्रमाणे " बालकाच्या भावी जीवनाची मुहूर्तमेढ प्राथमिक शिक्षणाने रोविली जाते. या दृष्टीने गुणवत्ता पूर्ण प्राथमिक शिक्षणाचा प्रसार हेच समाज परिवर्तनाचे व समाज विकासाचे मूलभूत साधन ठरु शकते". महाराष्ट्र राज्य शासनाने राज्यातील प्राथमिक शिक्षणाच्या प्रसारासाठी आणि गुणवत्ता वाढीसाठी प्रयत्न चालविले आहेत. परंतू प्राथमिक शिक्षणाच्या सार्वत्रिकी करणाचे उद्दिष्ट, संकल्प आणि सिध्दी यातील तफावतीमुळे इ.स. २००० पर्यंत लांबणीवर टाकण्यात आलेले आहे. प्राथमिक शाळेत पटनोंदणी व गळती ही समस्या फार चिंतनीय बाब झालेली आहे. ब-याच प्राथमिक शाळांमध्ये प्रशासनाची स्थिती समाधानकारक नाही असे जनमानसात बोलले जाते. त्यामुळे संशोधकाला माढा तालुक्यातील प्राथमिक शाळांच्या प्रशासनाची आजची सद्य:स्थिती काय आहे हे जाणून घेण्याची उत्सुकता निर्माण झाली. म्हणूनच संशोधकाने खालील विषय संशोधन अभ्यासासाठी निवडला.

## १.२ संशोधनाचा विषय -

"माढा तालुक्यातील प्राथमिक शाळांच्या प्रशासनाचा तौलनिक अभ्यास "(COMPARATIVE STUDY OF THE ADMINISTRATION OF PRIMARY SCHOOLS IN MADHA TALUKA.)"

संशोधन विषयातील शब्द प्रयोगांचा अर्थ संशोधनाच्या व्याप्तीसाठी व योग्य त्या स्पष्टीकरणासाठी खाली दिलेला आहे.

माढा तालुका :-


महाराष्ट्र शासनाच्या जमीन महसूल सर्वेक्षणाप्रमाणे सोलापूर जिल्ह्यातील ११ तालुक्यांपैकी माढा तालुका हा एक ११८ गावांचा समावेश असलेला एक वैशिष्ट्यपूर्ण तालुका आहे. त्याच्या चतु:सिमा खालील प्रमाणे आहेत. दक्षिणेला पंढरपूर तालुका (जिल्हा सोलापूर ) उत्तरेला करमाळा तालुका (जिल्हा सोलापूर) पूर्वेला बार्शी तालुका (जिल्हा सोलापूर आणि पश्चिमेला इंदापूर तालुका (जिल्हा पुणे ) आहे. माढा तालुक्याची लोकसंख्या २,२७,४४३ इतकी आहे. या माढा तालुक्यात सोलापूर जिल्हा परिषदेच्या १२५ प्राथमिक शाळा आहेत. खाजगी शिक्षण संस्थेच्या विना अनुदानित ०५ प्राथमिक शाळा आहेत आणि कुर्डुवाडी नगरपालिकेने चालविलेल्या १० प्राथमिक शाळा आहेत. सोबत माढा तालुक्याचा नकाशा जोडलेला आहे.

प्राथमिक शाळा :-

१) सोलापूर जिल्हा परिषदेने चालविलेल्या प्राथमिक शाळा -

सोलापूर जिल्हा परिषदेच्या माढा तालुका पंचायत समितीच्या अंतर्गत एकूण १२५ प्राथमिक शाळा आहेत. या शाळा अनुदानित आहेत. या शाळांचा १०० टक्के खर्च महाराष्ट्र शासना मार्फत केला जातो. ह्या शाळांचे प्रशासन माढा तालुका पंचायत समिती शिक्षण विभाग

माढा तालुक्यातील नमुनागत
प्राथमिक शाळांच्या गावांचा
नकाशा



गटशिक्षणाधिकारी यांच्याकडून चालविले जाते. संशोधकाने या शाळांपैकी दहा शाळांचा आपल्या संशोधन विषयात समावेश केलेला आहे.

२) <u>कुर्डुवाडी नगरपालिकेने चालविलेल्या प्राथमिक शाळा</u> -

कुर्डुवाडी नगरपालिका, कुर्डुवाडी परिसरात एकूण १० प्राथमिक शाळा चालविते. या सर्व शाळा अनुदानित असून त्यांचा १०० टक्के खर्च शासनामार्फत केला जातो. या शाळांचे प्रशासन, प्रशासन अधिकारी, नगरपालिका प्राथमिक शिक्षण मंडळ, कुर्डुवाडी यांच्याकडून केले जाते. संशोधकाने प्रस्तूत १० शाळांचा आपल्या संशोधन विषयात समावेश केलेला आहे.

(३) <u>खाजगी विना अनुदानित प्राथमिक शाळा</u> -

माढा तालुक्यात खाजगी स्वयंसेवी संस्था एकूण ०५ प्राथमिक शाळा चालवित आहेत. या सर्व शाळा विना अनुदानित आहेत. त्यांचे प्रशासन खाजगी व्यवस्थापनसमितीकडून चालविले जाते व त्यांचा आर्थिक भार खाजगी व्यवस्थापन समिती उचलते. संशोधकाने या सर्व ०५ शाळांचा आपल्या संशोधन विषयात समावेश केलेला आहे.

## ➢ प्राथमिक शाळा संकल्पना -

बालकांच्या भावी आयुष्याचा पाया प्राथमिक शिक्षणाने घतला जातो. मुलांच्या शारीरिक, मानसिक, बौध्दिक, नैतिक, सामाजिक व सांस्कृतिक विकासासाठी आवश्यक असणाऱ्या सर्व पैलूंच्या विकासाला पोषक असे प्राथमिक स्वरुपाचे शिक्षण म्हणजे प्राथमिक शिक्षण असे आज मानले जाते. प्राथमिक शिक्षण हे राष्ट्र विकासाचे प्रभावी साधन आहे. ६ ते १४ वर्षे वयोगटातील मुलांना शिक्षण देण्याचे कर्तव्य शासनाने मान्य केले आहे व त्या वयोगटातील मुलांना पालकांनी शाळेत पाठविलेच पाहिजे असा निर्बंध घातला आहे. महाराष्ट्र शासनाने इयत्ता पहिली ते सातवीच्या अभ्यासक्रमात प्राथमिक शिक्षणाची बिबिध उद्दिष्टे समाविष्ट केलेली आहेत. त्यापैकी नैतिक व सामाजिक मूल्यांची जोपासना करणे, आरोग्यमय जीवनासाठी आवश्यक असणाऱ्या सवयींचा विकास करणे, स्वावलंबनाची सवय आणि श्रमप्रतिष्ठेची वृत्ती विकसित करणे आणि भावनिक एकात्मता, नागरी जाणीव आणि नैतिक जबाबदारी यांचा समावेश असलेला राष्ट्रीय दृष्टीकोन विकसित करणे इत्यादी प्रमुख उद्दिष्टे आहेत. संशोधकाने इयत्ता पहिली ते सातवी या वर्गांचा आपल्या संशोधन विषयात प्राथमिक शाळा म्हणून समावेश केलेला आहे.

## ➢ प्राथमिक शाळांचे प्रशासन -

सत्तेच्या विकेंद्रीकरणाच्या धोरणानुसार जिल्हा हा घटक मानून जिल्हा परिषदा, नगरपालिका आणि ग्रामपंचायती स्थापन करण्यात आल्या आणि प्राथमिक शाळांची जबाबदारी जिल्हा परिषद आणि नगरपालिका यांच्यावर टाकण्यात आली. जिल्ह्यातील शैक्षणिक कार्यक्रम जिल्ह्याच्या शिक्षण समितीव्दारा पार पाडला जातो. जिल्हा शिक्षणाधिकारी सचिव म्हणून काम पाहतात. तसेच तालुका पातळीवर तालुका पंचायत समितीव्दारे त्या त्या तालुक्यातील शिक्षण कार्यक्रम राबविला जातो. तसेच नगरपालिका शिक्षणमंडळाकडून नगरपालिका हद्दीतील शिक्षण कार्यक्रम राबविला जातो. त्याशिवाय स्थानिक पातळीवर खाजगी स्वयंसेवी संस्था जनहित डोळ्या समोर ठेवून शिक्षणाची जबाबदारी पार पाडतात. संशोधकाने सोलापूर जिल्हा परिषद, कुर्डुवाडी

नगरपालिका आणि खाजगी स्वयंसेवी संस्था यांनी माढा तालुक्यात चालविलेल्या प्राथमिक शाळांचा आपल्या संशोधन विषयात समावेश केलेला आहे. विविध पातळीवर चालविलेल्या प्राथमिक शाळांच्या प्रशासनाचा संशोधकाने तौलनिक अभ्यास केलेला आहे.

## ➢ तौलनिक अभ्यास -

तौलनिक अभ्यास म्हणजे एखाद्या विशिष्ट परिस्थितीत एखादे विशिष्ट तत्व डोळयासमोर ठेवून विविध घटकातील विविध बाबींची समान तत्वाच्या अनुषंगाने तुलना करुन निष्कर्ष काढणे होय. तौलनिक अभ्यास संशोधनाच्या दृष्टीने प्रस्तुत संशोधकाने माढा तालुक्यातील, जिल्हा परिषद, कुर्डुवाडी नगरपालिका आणि माढा तालुक्यातील खाजगी स्वयंसेवी संस्थांनी चालविलेल्या प्राथमिक शाळांच्या प्रशासनाचा खालील घटकांच्या अनुषंगाने तुलनात्मक अभ्यास केलेला आहे.

(१) मनुष्यबळ (२) अभ्यासक्रम उपक्रम (३) अर्थव्यवस्था (४) भौतिक सुविधा (५) शैक्षणिक उपक्रमांची राबवणूक (६) प्रशासनमंडळाचे अधिकार कार्ये (७) सामाजिक दर्जा (८) शासकीय योजनांचे सहाय्य (९) तक्रारी आणि (१०) प्रशासनामध्ये समन्वय व सुधारणा होण्यासाठी कांही प्रयत्न/ उपाय.

## १.३ संशोधन विषयाचे महत्व -

प्रत्येक राष्ट्राच्या जीवनात प्राथमिक शिक्षणाला अनन्य साधारण महत्व आहे. राष्ट्रीय विचारधारा व चारित्र्याची जडणघडण करण्यामध्ये प्राथमिक शिक्षणाचा सिंहाचा वाटा आहे. प्राथमिक शिक्षण हे राष्ट्रीय प्रगतीचा पाया आहे. प्राथमिक शिक्षणाकडे दुर्लक्ष केल्यामुळेच भारताची प्रगती वेगाने होऊ शकली नाही असे जाणकारांचे मत आहे. भारतातील लोकशाहीचे भवितव्य बहुसंख्य समाज किती सुजाण आहे. किती कार्यक्षम आहे, किती कर्तव्यनिष्ठ आहे या गोष्टीवर अवलंबून आहे. त्या दृष्टीने विचार केला तर प्राथमिक शिक्षण हे राष्ट्र विकासाचे प्रभावी साधन आहे. आर्थिक, सामाजिक व सांस्कृतिक विकासासाठी प्रत्येक नागरिकाला प्राथमिक शिक्षणाची गरज आहे. प्राथमिक शिक्षण ही प्रत्येक मुलाची मूलभूत गरज आहे. जगातील सर्व प्रगत देशात प्राथमिक शिक्षण हे सक्तीचे , मोफत व सार्वत्रिक आहे. आपल्या देशातही घटनेतील ४५ व्या कलमान्वये ते मोफत, सक्तीचे व सार्वत्रिक आहे. परंतू घटनेतील घोषणेनुसार प्राथमिक शिक्षण सार्वत्रिक करण्यामध्ये फार मोठे यश मिळालेले नाही याचे कारण असे की भारतातील ६ ते १४ वर्षे वयोगटातील सर्व मुले घटनेतील तरतुदीनुसार इ.स. १९६० मध्ये सक्तीच्या प्राथमिक शिक्षण योजनेखाली यावयास हवी होती. परंतू ३८ वर्षे होऊनसुध्दा अनेक सामाजिक, आर्थिक कारणांमुळे प्रत्यक्षात तसे झाले नाही. प्राथमिक शिक्षण प्रसारातील प्रमुख समस्या म्हणजे अनुपस्थिती, गळती आणि स्थगिती होत. अनुपस्थिती म्हणजे गैरहजेरी. म्हणजेच मुलांचे शाळेत न जाणे गळती म्हणजे शैक्षणिक अपव्यय. म्हणजेच विद्यार्थी प्राथमिक शाळेत दाखल झाल्यानंतर त्याने कायम स्वरुपाची साक्षरता प्राप्त करण्यापूर्वी शाळा सोडणे आणि विद्यार्थ्यास एकाच इयत्तेत एका वर्षापेक्षा अधिक वर्षे काढावी लागते यालाच स्थगिती किंवा नापासी असे म्हणतात. या समस्यांमुळे प्राथमिक शिक्षणाचे सार्वत्रिकिकरण अपेक्षित गतीने नियोजित कालखंडात होऊ शकले नाही.

इ.स. १९९२ मध्ये महाराष्ट्र शासनाने एका "टास्क फोर्स" ची नियुक्ती केली होती. इ.स. २००० पर्यत महाराष्ट्रातील एकही बालक प्राथमिक शिक्षणापासून वंचित राहणार नाही असे उद्दिष्ट ठरवून ते साध्य करण्यासाठी या "टास्क फोर्स" ने निश्चित स्वरुपाचा कृती कार्यक्रम तयार केला. या कृतीकार्यक्रमाची अंमलबजावणी १९९४-९५ या वर्षापासून सुरु झाली आहे. या जिव्हाळ्याच्या उपक्रमात शिक्षक, स्वयंसेवी संस्था, स्थानिक स्वराज्य संस्थांचे सदस्य आणि पदाधिकारी यांचा वैचारिक सहभाग असावा अशी अपेक्षा "टास्क फोर्स" ने केली आहे. माढा तालुक्यातील प्राथमिक शिक्षणाच्या सद्य:स्थितीचा आढावा घेऊन प्राथमिक शिक्षणाच्या सार्वत्रिकिकरणाच्या मार्गातील समस्या आणि त्यावरील उपाय योजनांचा विचार प्राधान्याने करण्यासाठी, तसेच विद्यार्थी संख्या वाढविणे, शाळेचा शैक्षणिक दर्जा उंचावणे यासाठी काय करावे, तसेच प्रशासनात कोणकोणत्या समस्या येतात यांचा अभ्यास करुन त्या समस्यांवर उपाययोजना सुचवाव्यात यासाठीच संशोधकाने प्रस्तुत संशोधन विषय घेतलेला आहे.

हे संशोधन प्राथमिक शाळेतील मुख्याध्यापकांना उपयोगी पडेल. कारण मुख्याध्यापकांच्या प्रशासकीय समस्यांवर या संशोधनातून प्रकाश टाकला जाईल त्यावर उपाय शोधण्याचा प्रयत्न राहील. हे संशोधन शिक्षकांनाही उपयोगी पडेल कारण शिक्षक हा प्राथमिक शिक्षण प्रशासनाचा एक घटक आहे. विद्यार्थी व मुख्याध्यापक यांच्यातील दुवा आहे. त्यांना प्राथमिक शाळांच्या प्रशासनातील समस्या समजतील व त्या कशा दूर करता येतील याचे मार्गदर्शन मिळेल. प्राथमिक शिक्षणाची परवड होण्यामागील समस्यांचा आढावा घेऊन त्या दूर करण्याचा प्रयत्न करण्यासाठी हे संशोधन शिक्षणाधिकारी व पालक वर्गाला देखील उपयोगी पडेल. एकूण हे संशोधन शैक्षणिक दृष्ट्या महत्वाचे आहे.

## १.४ संशोधनाची व्याप्ती व मर्यादा -

संशोधकाने आपल्या या संशोधनासाठी व्याप्ती व मर्यादा खालील प्रमाणे ठेवलेली आहे -

(१) या संशोधनाची व्याप्ती माढा तालुक्यापुरतीच मर्यादित आहे.

(२) हे संशोधन माढा तालुक्यातील जिल्हा परिषदेने चालविलेल्या १० प्राथमिक शाळा, कुर्डुवाडी नगरपालिकेने चालविलेल्या १० प्राथमिक शाळा आणि खाजगी स्वयंसेवी संस्थांनी चालविलेल्या ०५ प्राथमिक शाळा यांच्या पुरतेच मर्यादित आहे.

(३) हे संशोधन इयत्ता पहिली ते सातवीच्या वर्गाच्या प्राथमिक विभागापुरतेच मर्यादित आहे.

(४) हे संशोधन प्राथमिक शाळांच्या प्रशासना पुरतेच मर्यादित आहे.

(५) हे संशोधन ऑक्टोबर १९९८ ते जून २००० या कालावधी अवस्थेपुरतेच मर्यादित आहे.

(६) या संशोधनात जिल्हा परिषदेच्या प्राथमिक शाळा, कुर्डुवाडी नगरपालिकेच्या प्राथमिक शाळा आणि खाजगी स्वयंसेवी संस्थांनी चालविलेल्या प्राथमिक शाळांच्या प्रशासनाचा तौलनिक अभ्यास कलेला आहे.

## १.५ संशोधनाची उद्दिष्टे -

खालील उद्दिष्टांबाबतीत संशोधन विषयातील प्राथमिक शाळांच्या प्रशासनाचा तौलनिक अभ्यास करणे.

(१) मनुष्यबळ - प्राथमिक शाळांमधील मुख्याध्यापक, शिक्षक यांची वर्गाच्या संख्येनुसार नेमणुक केली आहे किंवा नाही. सदरची नेमणूक वर्षाच्या सुरुवातीला केली जाते काय, यांचा अभ्यास करणे.

(२) अभ्यासक्रम, अध्यापन व अभ्यासेतर उपक्रमांची राबवणूक व्यवस्थितपणे केली जाते काय ह्याचा अभ्यास करणे.

(३) अर्थव्यवस्था - अनुदानित शाळांच्या अर्थव्यवस्थेचा तसेच विनाअनुदानीत शाळांच्या अर्थव्यवस्थेचा अभ्यास करणे. अपु-या आर्थिक तरतुदींचा शिक्षणाच्या कार्यवाहीवर कांही विपरित परिणाम होतो काय याचा अभ्यास करणे.

(४) शाळा इमारत सुव्यवस्थित आहे काय, शैक्षणिक भौतिक सुविधा गरजेनुसार व पुरेशा प्रमाणात पुरविल्या जातात काय याचा अभ्यास करणे.

(५) विविध शालेय उपक्रम राबविण्याचे स्वातंत्र्य अधिका-यांना, मुख्याध्यापकांना वा शिक्षकांना आहेत काय किंवा नसेल तर त्या अभावी शालेय शिक्षणाचे उद्दिष्ट साध्य करण्यात व्यत्यय येतो काय याचा अभ्यास करणे.

(६) प्रशासन मंडळाची रचना व अधिकार या बाबींचा अभ्यास करणे.

(७) प्राथमिक शाळांच्या सामाजिक दर्जा विषयी आढावा घेणे.

(८) शासकीय योजनांचे शाळांना सहाय्य व सहकार्य कितपत मिळते ह्याचा परामर्श घेणे.

(९) अधिकारी, मुख्याध्यापक व शिक्षक ह्यांच्यामधील घडून येणा-या संभाव्य तक्रारींची न्यायविषयक तरतुदींची माहिती जाणून घेणे.

(१०) प्रशासनामध्ये समन्वय व सुधारणा होण्यासाठी कांही उपाय सुचविणे.

## १.६ प्रकरणांचे सुत्रिकरण -

संशोधकाने संशोधनाचा अहवाल पुढील प्रकरणानुसार सादर केला आहे.

## प्रकरण पहिले - प्रास्ताविक

शिक्षणाच्या उद्दिष्टपूर्तीसाठी शैक्षणिक प्रशासन हे कार्यक्षम व प्रभावी असावे लागते. शैक्षणिक प्रशासन एक सामाजिक उपक्रम आहे. माढा तालुक्यातील प्राथमिक शाळांच्या प्रशासनाची आजची स्थिती काय आहे हे जाणून घेण्यासाठी प्रस्तूत संशोधनाचे काम संशोधकाने हाती घेतले. या प्रकरणात विषय प्रवेश, संशोधनाचा विषय, संशोधन विषयाचे महत्व, संशोधनाची व्याप्ती व मर्यादा संशोधनाची उद्दिष्टे, आणि प्रकरणांचे सुसुत्रिकरण यांचा समावेश आहे.

## प्रकरण दुसरे - संबंधित संदर्भ साहित्याचा व संशोधनाचा अभ्यास

या प्रकरणात अभ्यासकाने संबंधित संदर्भ साहित्याचा व संशोधनाचा अभ्यास या विषयी माहिती दिली आहे. पूर्वी झालेल्या संशोधनाची उद्दिष्टे, कार्यपध्दती व निष्कर्ष दिलेले आहेत.

## प्रकरण तिसरे - प्राथमिक शाळांचे प्रशासन

प्राथमिक शाळेचे प्रशासन याबद्दलची तात्वीक माहिती या प्रकरणात दिली आहे. शालेय प्रशासन, प्रशासनाची व्याप्ती, शालेय प्रशासनाचे हेतू व उद्दिष्टे, शालेय प्रशासनाचे घटक, राज्य पातळीवरील, जिल्हा व तालुका पातळीवरील शैक्षणिक प्रशासन, या विविध पातळीवरील शैक्षणिक प्रशासनाचा आकृतीबंध मुख्याध्यापक, शिक्षक व अधिकारी यांचे हक्क व कर्तव्ये इत्यादी गोष्टींची माहिती या प्रकरणात उपप्रकरणांच्या रुपाने दिलेली आहे.

## प्रकरण चौथे - संशोधनाचे नियोजन व कार्यपध्दती

या प्रकरणामध्ये माहिती संकलनासाठी प्रश्नावली, मुलाखती, भेटी व निरिक्षण या संशोधन साधनांचा वापर कसा केला याबाबतची माहिती दिली आहे.

## प्रकरण पाचवे - माहितीचे संकलन, विश्लेषण व अर्थनिर्वचन

या प्रकरणात विविध साधनांव्दारे संकलित केलेल्या माहितीचे सारणीनुसार विश्लेषण व अर्थनिर्वचन केलेले आहे.

## प्रकरण सहावे - निष्कर्ष व शिफारशी

या प्रकरणात संकलित माहितीच्या विश्लेषण व अर्थनिर्वचनावरुन निघालेले निष्कर्ष दिलेले आहेत. तसेच या निष्कर्षावरुन समस्येवर आधारित शिफारशींचा समावेश केलेला आहे. तसेच पुढील संशोधनासाठी कांही विषय सुचविले आहेत.

संदर्भ :-

(१) जगताप, ह.ना. ( १९९२) : "<u>शिक्षणातील नवप्रवाह व नवप्रवर्तने</u>" पुणे, नूतन प्रकाशन, पृ. ४१.

(२) अकोलकर, ग.वि.,पाटणकर ना.वि. (१९७३) : "<u>शालेय व्यवस्था आणि प्रशासन</u>", पुणे, निळकंठ प्रकाशन, पृ. १७.

(३) ताम्हणकर, श्री.दा. (१९८४) : "<u>शैक्षणिक प्रशासन व नियोजन - भाग-१</u>" पुणे, नूतन प्रकाशन, पृ.१.

(४) तत्रैव ............................पृ. २.

(५) पाटील, लीलाय कुलकर्णी, विश्वंभर ( १९७४) : "<u>आजचे शिक्षण : आजच्या समस्या</u>", पुणे, श्री विद्या प्रकाशन, पृ. ३३.